| MHKO100009922018 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २१२/२०१८</u>**<br><br>रुकव्वा चंद्रकांत कांबळे वगैरे.<br>विरुध्द<br>शिवरुप ईराप्पा कांबळे वगैरे. |
|---|---|

## <u>निशाणी क्र.२६ वर आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२-अ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावेचे समन्स व नाटीस प्रतिवादी क्र.२-अ यांना लागू झाली असून त्याप्रमाणे प्रतिवादी ही मे.कोर्ट मजकुरी हजर झाली आहे. दरम्यानचे काळात कोवीड-१९ महारामीमुळे न्यायालयीन कामकाजात शिथीलता आली होती. तसेच, महसूल कार्यालयातील कामकाजावरही निर्बंध आणले गेले होते. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२-अ यांना आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत महसूल कार्यालयाकडून वेळेत मिळू शकली नाहीत. तसेच, सन-२०२२ मध्ये महाराष्ट्र राज्य परविहन महामंडळाच्या कर्मचा-यांच्या संपामुळे देखील परिवहन यंत्रणा ठप्प झाली होती. त्यामुळे, देखील त्यांना आपले वकीलांना भेटून कैफियत व म्हणणे सादर करणेबाबत माहिती देता आली नाही. त्यामुळे, त्यांचे विरुध्द विना कैफियत आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे देणेस जाणुनबुजून विलंब केलेला नाही अगर टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द न केलेस प्रस्तुत प्रतिवादी यांचे फार फोठे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली.

०३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिले व असे कथन केले की, प्रतिवादी यांचा अर्ज चुकीचा व बेकायदेशिरी आहे. अर्जात नमुद केलेली कारणे चुकीची आहेत. प्रतिवादी यांनी काम लांबणीवर टाकण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. यातील वादी यांनी पुरावा दिलेला आहे व त्यांचेविरुध्द नो क्रॉसचा आदेश झालेला आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे, वादीने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. अर्ज मंजूर केलेस वादी यांना प्रतिवादी यांनी २-३ वर्षांपासून त्रास देऊन खर्चात पाडले असलेने प्रतिवादी यांना रक्कम रु.३,०००/- कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२-अ यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली

नाही म्हणून त्यांचे विरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला होता.

०५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२-अ यांना समन्सची बजावणी होऊन हजर होऊन मुदतीत कैफियत न दिल्याने दिनांक ०४.०४.२०१९ रोजी विना कैफियत आदेश पारीत करणेत आला. प्रस्तुतचा अर्ज दिनांक २९.०६.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.२-अ यांनी कोवीड-१९ महारामीमुळे न्यायालयीन कामकाजात शिथीलता आली होती. तसेच, महसूल कार्यालयातील कामकाजावरही निर्बंध आणले गेले होते. त्यामुळे, त्यांना आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत महसूल कार्यालयाकडून वेळेत मिळू शकली नाहीत. तसेच, सन-२०२२ मध्ये महाराष्ट्र राज्य परविहन महामंडळाच्या कर्मचा-यांच्या संपामुळे देखील परिवहन यंत्रणा ठप्प झाली होती. त्यामुळे, देखील त्यांना आपले वकीलांना भेटून कैफियत व म्हणणे सादर करणेबाबत माहिती देता आली नाही असे कारण नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात सदर कारण व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारणे संयुक्तीक वाटत नाहीत. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादी क्र.२-अ यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२-अ यांना त्यांची कैफियत सादर करु देणे मला योग्य वाटते. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा ब-याच विलंबाने दाखल केलेला असल्याने प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.२-अ यांनी पुढील तारखेच्या आत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.२-अ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.09.06 18:04:32 +0600

**( एस.ए.राठोड )**

गडहिंग्लज.
दिनांकः ०६/०९/२०२२.

२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 06/09/2022 |
| Order signed by P.O. on | 06/09/2022 |
| Order uploaded on | 06/09/2022 |